राष्ट्रनिर्माते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आजादी का
अमृत महोत्सव



संपादक

डॉ. डोंगरे एल.बी.

# 17) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील भूमीका आणि योगदान.

**प्रा.डॉ.वसंत कदम**

इतिहास विभाग प्रमुख

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,

हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र).

---

एक महान तत्त्वचिंतक, बुद्धीप्रामाण्यवादी आणि लोकशाही मूल्यांचा पुरस्कार करणारे आंतरराष्ट्रीय किर्तीचे युगपुरुष अशी जगभरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ख्याती आहे. डॉ.बाबासाहेब म्हटले की, त्यांचे असंख्य तेजस्वी दर्शन डोळयासमोर उभे राहतात. सहस्त्र योगाचे तेज यांच्या व्यक्तिमत्त्वात सामावले आहे, असे प्रकांड कायदे पंडित डॉ.बाबासाहेब आंबेडकर, समग्र समाजावर आपल्या बुद्धिवादाचे सोनेरी किरण पसरवणारे भारतरत्न डॉ.आंबेडकर, ज्यांच्या संपूर्ण आयुष्य एक संघर्षमय चळवळ होती असे क्रांतिवीर डॉ.आंबेडकर, भारतीय घटनेचे शिल्पकार, कायदेतज्ञ, विधीतज्ञ डॉ.आंबेडकर, मानवतावादाचे पुरस्कार, प्रचार आणि प्रसार करणारे महापुरुष डॉ.आंबेडकर, ज्यांच्या दैदिप्यमान दर्शनाने डोळे अक्षरशः दिपून जातात.

भारतीय इतिहासातील एक अत्यंत असामान्य, असाधारण व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख कायमच आहे. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय विचार प्रवाहाचे व्यापक ज्ञान असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाही समाजवादाचे कट्टर पुरस्कर्ते होते तर, हुकूमशाही राजवटीचे ते कट्टर विरोधक होते, म्हणूनच त्यांनी

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतातील संस्थानिकांच्या हुकूमशाही राजवटीला प्रखर विरोध केला. प्रस्तुत शोधनिबंधात हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि योगदान या विषयी माहिती घेतली आहे.

दि. 18 जुलै 1947 रोजी इंग्रजांनी भारतीय जनतेला स्वातंत्र्य देण्यासाठी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. याच कायद्यानुसार 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. वरील कायद्यानुसार देशी राज्य आणि संस्थानिकांना ही त्यांनी आपले राज्य भारतात की पाकिस्तानात किंवा स्वातंत्र राहावयाचे या बाबतीत स्वातंत्र्य मिळाले होते. त्यावेळच्या भारतातील एकुण 563 संस्थानांपैकी 560 संस्थानिक पाकिस्तान आणि भारतीय संघराज्यात विलीन झाले. तर काश्मीर, जुनागड आणि हैदराबाद या राज्यांच्या विलीनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. त्यात हैदराबाद राज्याचा सत्ताधीश सातवा निजाम मीर उस्मान अलीखान यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्वीच 11 जून 1947 रोजी आपले हैदराबाद राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. भारत देशाच्या जवळपास मध्यभागी असलेले आणि भू-क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत देशात दुसऱ्या क्रमांकाचे असलेले तसेच लोकसंख्येच्या दृष्टीने भारतात पहिल्या क्रमांकाचे असलेले हैदराबाद संस्थान स्वतंत्र राहणे या संस्थानांतील जनतेच्याच नव्हे तर भारत देशाच्या हिताचे नव्हते. तसेच हैदराबाद संस्थानच्या विलीनीकरणा शिवाय भारताच्या स्वातंत्र्यालाही पुर्णत्व प्राप्त होणार नाही. ही बाब डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आली होती.

या हैदराबाद संस्थानात 70 टक्के हिंदू, 18 टक्के दलित, 11 टक्के मुसलमान आणि 1 टक्का इतर लोक होते. संस्थानातील बहुसंख्यांक लोक मुस्लिमेत्तर होते. संस्थानिक मात्र मुस्लीम होते आणि त्यांची राजवट हुकूमशाही, दडपशाही व अत्याचारी होती. त्यामुळे राज्यातील जनतेनेच निजामी राजवटीच्या विरोधात स्वातंत्र्य आंदोलन सुरू केले. त्याच कालावधीत भारत देशाचे कायदे मंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळी भारत सरकारला दिलेला कायदेविषयक सल्ला अत्यंत मोलाचा ठरला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हैदराबाद राज्यातील दलितांचे प्रबोधन आणि संघटन केले हे करण्यासाठी त्यांना हैदराबाद राज्याच्या सरहद्दीवर सभा घ्याव्या लागल्या, ते भारतातील दलित समाजाचे पुढारी होते परंतु प्रत्यक्ष हैदराबाद संस्थानात येऊन सभा घेऊ शकले नाहीत, कारण हुकूमशाही राजवटीत लेखन आणि भाषण स्वातंत्र्यावर बंदी होती, त्यामुळे निजाम सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना निजाम राज्यात प्रवेश करण्यास व सभा घेण्यास बंदी घातली होती. तरी पण त्यांनी निजाम राज्याच्या सरहद्दीवरील भागात येऊन अनेक सभा घेतल्या 15 ऑक्टोंबर 1933 मध्ये ते औरंगाबादला आले होते या ठिकाणी निजामाने सभेसाठी परवानगी नाकारली, तरी पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी छोटेखानी बैठकीचे आयोजन केले, ही मराठवाड्यातली पहिलीच बैठक होती. त्यानंतर हैदराबाद राज्याच्या सरहद्दीवर चाळीसगांव तालुक्यातील मक्रणपूर येथे 30 डिसेंबर 1938 रोजी सभेचे आयोजन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली या ठिकाणी त्यांनी समाज बांधवांना

उद्देशून बोलताना म्हणाले तुमच्यावर अनेक बंधने आहेत तुम्हाला भाषण स्वातंत्र्य व मिरवणूक स्वातंत्र्य नाही नेहमी मी तुमची दुःखे नाहीशी करण्याचा प्रयत्न करेल तसेच संस्थानातील शैक्षणिक सोयीचा अभाव सामाजिक गुलामगिरी, वेठबिगारी व आर्थिक दुबळेपणा या सर्व परिस्थितीचा त्यांनी आढावा घेतला, या सभेनंतर 23 फेब्रुवारी 1941 रोजी सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील तडवळे ढोकी याठिकाणी एक सभा घेतली आणि आपले प्रश्न सोडविण्यासाठी समाजबांधवांचे संघटन खूप महत्त्वाची आहे, बावन हक्क, गावकीची कामे, वेठबिगारी करणे बंद करा, मुलांना शाळेत पाठवा, आणि हुकूमशाही राजवटीला विरोध करा अशा पद्धतीचा संदेश त्यांनी समाज बांधवांना दिला, तसेच त्यांनी आपल्या मूकनायक, बहिष्कृत भारत आणि जनता या पक्षिक व वृत्तपत्राच्या माध्यमातून हैदराबाद राज्यातील दलित नेते व समाजालाही योग्य मार्गदर्शन केले, त्यामुळेच हैदराबाद संस्थानातील दलित समाजाने निजामाच्या विरोधात सशस्त्र आंदोलन केले, म्हणून हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान आणि भुमिका महत्त्वाची ठरते.

हैदराबाद स्वातंत्र्य आंदोलनाची खऱ्या अर्थाने पायाभरणी आर्य समाजाने केली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण या समाजाने सर्वप्रथम संस्थानांत समाजसुधारणेच्या माध्यमातून राजकीय सुधारणेची मुहूर्तमेढ रोवली, समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, धर्मभेद, अस्पृश्यतेला प्रखर विरोध केला. आर्य समाजाने जातीयतेला विरोध करून सर्व मानव समान आहेत, जातीव्यवस्था थोतांड आहे, आणि ती नष्ट झाली पाहिजे असा संदेश देऊन दलितांच्या उद्धारासाठी कार्य सुरू

करुन आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले, त्यामुळे राज्यातील दलित समाज आर्य समाजाकडे आकर्षित झाला आर्य समाजाने दलितांना आपल्यात सामावून घेतले व त्यांना समानतेची वागणूक दिली त्यावेळच्या परिस्थितीमुळे हजारो हिंदू आणि दलित बांधवांना भीती दहशत आणि अमिष देऊन मुस्लिम धर्म स्वीकारण्यास भाग पाडले होते त्यांना परत आपापल्या धर्मात विधिवत घेतले, आर्य समाजाच्या या सर्व कार्यामुळे मुस्लिमेतर समाज जागृत झाला तसेच खऱ्या अर्थाने हैदराबाद संस्थानातील दलित समाज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणेमुळेच सशस्त्र आंदोलनात उतरला संस्थानातील दलित चळवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार कार्य करत होती या संस्थानातील बी.एस. व्यंकटराव हे प्रती आंबेडकर म्हणून ओळखले जात होते, हैदराबाद स्टेट शेडयुल्ड कास्ट फेडरेशन ही संघटना आंबेडकरी विचारांची होती या संघटनेचे नेते जे.एच. सुबय्या यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार निजाम सरकारकडे जबाबदार सरकारची मागणी केली होती, या मागणीस हैदराबाद स्टेट काँग्रेसने ही पाठिंबा दिला होता. पुढे स्टेट काँग्रेसने हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्याची मागणी केली तीच मागणी हैदराबाद शेड्युल कास्ट फेडरेशन या संघटनेचे शेवटपर्यंत लावून धरली.

हैदराबाद राज्य भारतात विलीन झाले पाहिजे अशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पूर्वीपासूनच ठाम भूमिका होती, परंतु इत्तिहादुल मुसलमीन या संघटनेच्या बळावर आझाद हैदराबाद चे स्वप्न निजाम मीर उस्मान अली खान पाहत होता, तर कासीम रझवी यांनी स्थापन केलेल्या रझाकार या लष्करीसंघटनेच्या बळावरच स्वतंत्र

हैदराबाद राज्याची घोषणा निजामाने केली होती. निजामाचे हे धोरण आणि नीती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना तिळमात्र आवडणारी नव्हती. त्यांनी निजामाच्या धोरणाचा गांभीर्याने विचार करून हैदराबाद राज्य भारतात विलीन करण्याचा सल्ला निजामाला दिला. तसेच आपले संस्थान स्वतंत्र ठेवून त्यास संयुक्त राष्ट्र संघाची मान्यता व संरक्षण मिळविण्याचा प्रयत्न करणे व तशी अशा करणे म्हणजे आपण आपल्या कल्पनेच्या साम्राज्यात व्यर्थ वावरण्यासारखे आहे असा इशाराही डॉ.बाबासाहेबांनी निजामाला दिला होता.

हैदराबाद संस्थानातील जनतेचा लढा हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्त्वाखाली सुरू होता. या आंदोलनात दलितांनी सहभागी होऊन निजामाशी लढा द्यावा असा संदेश आणि आदेश डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्थानातील दलित जनतेला दिला. कारण निजाम हा आपला व आपल्या मातृभूमीचा शत्रू आहे, ते पुढे म्हणतात. संस्थानातील दलित बांधवांना मी असा इशारा देतो की, मुसलमानांच्या छळापासून बचाव करण्यासाठी सुखासुखी कोणीही धर्म सोडू नये किंवा धर्मांतर करू नये, जबरदस्तीने मुसलमान झालेल्या अस्पृश्यांनी, दलितांनी आपण कायमचे मुसलमान झालो असेही समजू नये, धर्मांतरित झालेले दलित बांधव कधीही आपल्या धर्मात परत येऊ शकतात व त्यांना आपल्या धर्मात सन्मानाने वागविले जाईल. अस्पृश्य बांधवांनी कोणत्याही परिस्थितीत आणि कितीही संकटे आली तरी निजाम व रझाकार या संघटनेला अत्याचारी, हुकूमशाही राजवटीला कधीही साथ देऊ नये, संस्थानातील सवर्ण, हिंदू आपल्यावर कितीही अन्याय करीत असतिल तरीही आपणं काही काळ शांत राहू,

सवर्ण किंवा हिंदू यांच्या रागामुळे आपली जात आपण धर्म सोडून देऊन आपण आपल्या शत्रू सोबत सामील होता कामा नये. दलितांचा संघर्ष पाहिल्या प्रथम स्वातंत्र्यासाठीचा असून त्यांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य हवे आहे, म्हणून आपण स्वातंत्र्यासाठी लढलो पाहिजे.

हैदराबाद चा निजाम हा आपला आणि आपल्या स्वातंत्र्याचा शत्रू आहे. स्वातंत्र्याच्या शत्रू बरोबर अस्पृश्यांनी हातमिळवणी, संगनमत केले तर दलित समाज बांधवांचा मोठा घात होईल. त्याचे मोठे दुष्परिणाम भोगावे लागतील. निजाम हा हिंदूस्थानचा आपल्या मातृभूमीचा, भारतभुमीचा शत्रू आहे. ही गोष्ट अस्पृश्यांनी, दलितांनी पहिल्यांदा लक्षात घेतली पाहिजे. हैदराबाद संस्थान भारतात विलीन झालेच पाहिजे व त्यासाठी आपण आग्रह धरला पाहिजे, लढा दिला पाहिजे, कारण हिंदुस्थान ची भौगोलिक एकता व अखंडता संपविण्याचा, बिघडविण्याचा हक्क कोणत्याही संस्थानिकाला नाही. हिंदी संघराज्याला जो विरोध निजामाने चालविला आहे. त्याबद्दल निजामाची किंचितही गय करता कामा नये. निजामाला हे कळाले पाहिजे की हिंदी संघ राज्यात तो जर सामील झाला आणि हिंदी राज्यघटनेने जर त्याच्या घराण्याला अभयवचन दिले तर त्याचे राजपद सुरक्षित होईल. निजामाच्या इत्तिहदुल मुसलमीन या संघटनेवर विश्वास टाकण्यापेक्षा हिंदूचा विश्वास संपादन करण्यात आपल्याला जास्त सुरक्षितता आहे, किंबहुना त्यांनी कसे वागावे हा त्यांचा प्रश्न आहे मला आज फक्त एवढीच तळमळ लागली आहे की, माझ्या बांधवांनी निजामाला कदापी साथ देऊ नये आणि आपल्या जातीच्या इमानदारी ला काळीमा फासू नये त्यांनी हे लक्षात ठेवावे की, निजाम हा

अस्पृश्यांचा व अस्पृश्यांच्या मातृभूमीचा विरोधक आणि शत्रू आहे. अस्पृश्य जाती ह्या भारतभूमी ची पहिली लेकरे आहेत. या हिंदुस्थानचे अस्पृश्य आधीसंतान आहेत, हिंदुस्थानातील इतर काही जातींची हिंद ही जितकी मातृभूमी आहे तितकीच ती अस्पृश्यांची ही मातृभूमी आहे या मातृभूमीच्या, मायभूमिच्या मोठेपणासाठी आणि मातृभूमीला हुकूमशाही राजवटीतून मुक्त करण्यासाठी आपण झगडले पाहिजे. मायभूमीचे स्वातंत्र्य व तिचे अखंडत्व कायम ठेवण्यासाठी दलितांनी जिवाभावाने लढण्यास तयार झाली पाहिजे. भारतभूमी, हिंदुस्तान हे आपले घर आहे, ही गोष्ट अस्पृश्यांनी कधीही विसरता कामा नये, असा अत्यंत तळमळीचा हृदयापासूनचा संदेश आणि आदेश डॉ.बाबासाहेब आंबेकरांनी आपल्या समाज बांधवांना दिला, म्हणूनच हैदराबाद संस्थानातील दलित बांधव हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून हैदराबाद स्टेट डिप्रेस्ड क्लास असोसिएशन, हैदराबाद स्टेट आधी हिंदू महासभा, स्टेट शेडट◌ुल्ड कास्ट फेडरेशन अशा विविध संघटनांच्या माध्यमातून आणि हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या माध्यमातून निजामाशी प्रखर आणि सशस्त्र लढा दिला, त्यामुळेच हैदराबाद संस्थान स्वातंत्र्य होऊ शकले म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या हैदराबाद स्वातंत्र्यलढ◌ात सिंहाचा वाटा होता असे म्हटले जाते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे आणि मार्गदर्शनामुळे हैदराबाद संस्थानातील दलित समाज जागृत होऊन हैदराबादच्या स्वातंत्र्य आंदोलनात सशस्त्र लढ्यात सहभागी झाला. हैदराबाद राज्यातील जनतेने सुरू केलेला सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह तसेच सशस्त्र आंदोलने आणि निजामाचे पोलीस, रझाकार हे

संस्थानातील जनतेवर करीत असलेल्या अन्याय अन्याचारावर भारत सरकार लक्ष ठेवूनच होते. हैदराबाद चा स्वातंत्र्यलढा हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचाच एक भाग आहे असे महात्मा गांधीजी नि र्धारित केले होते. येथील जनतेचा प्रदीर्घ आणि सशस्त्र लढा सुरू असताना हैदराबादचा निजाम मीर उस्मान अली खान आपले राज्य भारतीय संघराज्यात विलीन करण्यास तयार होत नव्हता. रझाकार संघटनेचा प्रमुख सय्यद कासीम रझवी वाटेल ते वल्गना करत होता.... पर्यंत हैदराबाद राज्यात मुस्लिमांना सार्वभौमत्व मिळणार नाही तोपर्यंत तलवार म्यानात घालू नका. एका हातात कुराण तर दुसऱ्या हातात तलवार घेऊन शत्रूचा नाश करा. राष्ट्राचे भवितव्य लेखणीच्या टोकाने नव्हे तर तलवारीच्या टोकाने घडत असते.. असे विध्वंसक वक्तव्य होत होती सर्व परिस्थितीचा विचार करून भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करण्याचे ठरविले. तत्कालीन कायदेमंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत सरकारला कायदेशीर मार्गदर्शन केले, त्यामुळेच हा लढा यशस्वी होऊ शकला 13 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद राज्यावर भारत सरकारने पोलीस·कारवाई केली, या घटनेस घ्ऑपरेशन पोलोङ असे ही म्हणतात. वास्तविक पाहता भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई केली होती, परंतु घ्लष्करी कारवाईङ असे म्हटल्यास कायदेशीर आंतरराष्ट्रीय प्रश्न निर्माण होईल म्हणून या कारवाईस कायदे मंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पोलीस ऍक्शन असे नाव देण्याचे भारत सरकारला सुचविले कारण घ्पोलीस ऍक्शन या शब्दामुळे हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणाचा प्रश्न हा भारताचा अंतर्गत प्रश्न ठरणार होता, तत्कालीन पंतप्रधान पंडित

नेहरु उप पंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल, महात्मा गांधी व स्वामी रामानंद तीर्थ यांच्याशी चर्चा करून हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी भारत सरकारने पोलीस कारवाई करावी अशी त्यांना विनंती केली. पोलीस कार्यवाही, पोलीस ऍक्शन करण्याचे ठरविले त्यानुसार 13 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद संस्थानावर पोलीस कारवाई पहाटे चार वाजता केली. हैदराबाद राज्यात एकाच वेळी पाच दिशेने भारतीय लष्कराने प्रवेश करून कारवाई सुरू केली 17 सप्टेंबर या दिवशी सायंकाळी पाच वाजता हैदराबादचा निजाम मीर उस्मान अली खान बहादूर यांनी युद्ध थांबवत असल्याची घोषणा केली, तर हैदराबाद संस्थांच्या लष्करप्रमुखांनी हैदराबाद संस्थान शरण येत असल्याचे जाहीर केले. अशाप्रकारे केवळ 109 तासात पोलीस कारवाई यशस्वी झाली आणि हैदराबाद राज्य स्वतंत्र्य झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायदेशीर मार्गदर्शनानुसार भारत सरकारने पोलीस कारवाई केल्यामुळे हैदराबाद राज्य भारतीय संघराज्यात विलीन करून घेण्यास भारत सरकारला यश मिळाले. वरील सर्व विवेचनावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे हे स्पष्ट होते होते.

**संदर्भ सूची :-**


1) कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मुंबई पॉप्युलर प्रकाशन, 9 वी आवृत्ती 1962

2) भालेराव आनंत, हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन ग्रह 2001

3) डॉ.कठारे अनिल, शोध मुद्रा, खंड दुसरा, शिवाजी प्रकाशन, पुणे ऑगस्ट 2007.

4) डॉ.विठ्ठल पी. व डॉ. कुंभार नागोराव, सर्वदर्शी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर डायमंड पब्लिकेशन, शनिवार पेठ, पुणे, सप्टेंबर 2016.

5) डॉ.कठारे अनिल, हैदराबाद राज्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, जानेवारी 2006.

6) डॉ.कठारे अनिल व डॉ.नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, नांदेड, कल्पना प्रकाशन, 1999.

7) डॉ.कठारे अनिल व डॉ.वाघमारे महादेव, हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाड्यातील दलित समाज, कल्पना प्रकाशन, नांदेड.